**<u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्गिका</u>**

# सीप्झ स्थानक येथील सर्व स्लॅबचे बांधकाम पूर्ण

## पॅकेज-७ मधील तीनही स्थानकांच्या सर्व स्लॅबचे बांधकाम पूर्ण

मुंबई, २२ डिसेंबर, २०२० - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) द्वारे राबवल्या जाणाऱ्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गावरील पॅकेज-७ ने सीप्झ स्थानकाच्या सर्व स्लॅब चे बांधकाम पूर्ण केले आहे. त्याच प्रमाणे या पॅकेज मधील मरोळ नाका आणि एम.आय.डी.सी. स्थानकांच्या सर्व स्लॅब चे बांधकाम पूर्ण झाले आहे. बेस स्लॅब, कॉन्कोर्स स्लॅब, मॅझेनाईन स्लॅब आणि रूफ स्लॅब असे सर्व स्लॅबचे बांधकाम पूर्ण करण्यात पॅकेज-७ ला प्रथम यश मिळाले आहे.

मरोळ नाका स्थानक एन.ए.टी.एम. (न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड) पद्धतीने बांधले जाणार असून येथे चार प्रवेश-निकासद्वार आहेत. मात्र सीप्झ आणि एम.आय.डी.सी. स्थानके कट-अँड-कव्हर पद्धतीने बांधण्यात येत आहेत. येथे अनुक्रमे चार आणि तीन प्रवेश-निकासद्वार आहेत.

"सीप्झ प्रामुख्याने व्यवसायिक केंद मानले जाते परंतु सध्या ते उपनगरीय रेल्वेमार्गाद्वारे जोडले गेले नाही. या क्षेत्रामध्ये इलेक्ट्रॉनिक प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळा, सीप्झ गाव बस स्थानक, होली स्पिरीट रुग्णालय, आरे मिल्क कॉलनी इत्यादी महत्त्वाची स्थळे आहेत त्यामुळे या व्यवसाय केंद्राला भेट देणाऱ्या प्रवाश्यांसाठी मोठी सोय उपलब्ध होणार आहे'',असे मुं.मे.रे.कॉ. चे व्यवस्थापकीय सांचालक श्री. रणजित सिंह देओल म्हणाले.

"परिसरातील वाहनांच्या रहदारीमुळे आमच्यासमोर बरीच आव्हाने उभी राहिली होती. तथापि, वाहतूक पोलिस आणि एम.सी.जी.एम. च्या सहाय्याने आमचे काम सोपे झाले. मेट्रो मार्ग-३ सुरू झाल्यानंतर, हे स्थानक उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिम उपनगरांना जोडण्याचे काम करेल", असे श्री. एस. के. गुप्ता, संचालक (प्रकल्प), मुं.मे.रे.कॉ. म्हणाले.

सीप्झ स्थानकावरून दाररोज २४००० हून अधिक प्रवाश्यांनी प्रवास करणे अपेक्षित आहे. पॅकेज-७ मध्ये एकूण ७६% बांधकाम पूर्ण झाले आहे. (समाप्त)

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com
Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com